# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२६/११/१७
## दि.२५/११/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५५१/१७,भादविक ३०२,महा.पो.का.क.३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | महेश विठ्ठल मारणे,वय-३६,रा.कात्रज,पुणे |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/११/१७ रोजी २१/०० वा. रिया स्नॅक्स सेंटर कात्रज बायपास हायवे रोड कात्रज,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्र बाळु पुजारी, बालाजी कदम व अमोल ढवळे यांचेसह नमुद ठिकाणी हजर असताना,फिर्यादी यांची व यातील नमुद इसमा बरोबर दारू पिण्याचे पैसे जमा करण्याचे कारणावरून बाचाबाची झाली त्याचा राग मनात धरून,त्याचेजवळील लोखंडी रॉडने जीवे मारण्याचे उद्देशाने फिर्यादी यांचे डोक्यात मारून,तसेच बाळु हनुमंत पुजारी,वय-३४,रा. कात्रज,पुणे याचेही कपाळावर मारून त्यांना गंभीर जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.पी.यादव ९४२२६४४५७७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ४४१/१७,भादविक २७९,३३८,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | बी.डी.भुजबळ, पो.ना. विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | कारवरील अज्ञात चालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/११/२०१७ रोजी सकाळी ०५/०० वा.लोहगाव एअरपोर्ट रोड,आकाशनगर जवळ, पुणे |
| **तपशिल** | विमानतळ पो.स्टे अ.म.रजि.नं.१०८/२०१७ सी.आर.पी.सी.१७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करता,यातील नमुद कारवरील अज्ञात चालकाने त्याचे ताब्यातील वाहन ने वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात आकाशनगरचे अलीकडे येरवडाकडुन चालवुन,नमुद ठिकाणी गिरीष अंकुश सर्जेराव,वय-६१ वर्षे,रा.महाराष्ट्र हौसींग बोर्ड,येरवडा,पुणे हे त्याचे राहते घरातुन प्रभातफेरी मारण्यासाठी त्याचे मित्रांसह लोहगाव एअरपोर्ट रोडने पायी चालत जात असताना,त्यांना पाठीमागुन जोरात धडक मारुन,गिरीष अंकुश सर्जेराव यांना खाली पाडुन,जबर जखमी करुन त्यांचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. डी.एन.जयसिंगकार |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे ५२८/१७,भादविक ३७९,४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.२००८ चे क. ४३, ६६,६६(ड),७२ प्रमाणे |
| **फिर्यादी** | गणेश पाटील,वय-३.७,रा.हिंजवडी,पुणे |
| **आरोपी** | विकी रामअवतार अगरवाल,वय-३६,रा.कोणार्क पुरम सोसा.कोंढवा,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/११/१७ व दि.२४/११/१७ रोजी झक्कास हॉटेल शिवाजी चौक,हिंजवडी,पुणे येथे ग्राहकांचे डेबीट कार्ड / क्रेडीट कार्ड रिडरव्दावे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम विकी अगरवाला याने फिर्यादी यांचे झक्कास हॉटेल मध्ये रोखपाल म्हणुन काम करीत असताना,त्याने फिर्यादी यांचे हॉटेल मध्ये येणा-या ग्राहकांची व हॉटेल मधील इतर कामगारांचे नकळतपणे नमुद कालावधीत मध्ये त्याचेकडील काळे रंगाचे कार्ड रिडर / स्किमर मध्ये स्वाईप करून घेवुन,ग्राहकाने टाकलेला पीन नंबर पाहुन तो लक्षात ठेवुन ग्राहक गेल्यानंतर लिहुन घेवुन फसवणुक करण्याचे उद्देशाने ग्राहकांचे डेबीट / क्रेडीट कार्डवरील पर्सनल माहिती चोरून फिर्यादी व ग्राहकांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. अरूण वायकर ९९२३४९८५८७ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे २७६/१७,भादविक ४०६,४०८,४०९,३४ |
| **फिर्यादी** | राजेशकुमार पिल्ले,वय-३९ वर्षे,रा.कशेली,जि.ठाणे. |
| **आरोपी** | १.अभिजित संजय गोसावी,वय-२१ वर्षे,रा.मु.पो.लाखेवाडी,ता.इंदापुर,जि.पुणे २.अवि नाश अशोक कांबळे,वय-३४ वर्षे,रा.डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसाहत,देव शाळे जवळ,डी.पी. रोड, औंध,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०९/२०१७ रोजी सकाळी ११/०० वा. ते दि.२१/११/२०१७ रोजी २३/३० वा.सेक्युरी ट्रान्स इंडीया प्रायव्हेट लिमिटेड,सत्संग भवन,औंध रोड,खडकी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे सेक्युरीट्रान्स इंडीया प्रायव्हेट लिमिटेड,नागालराया,दिल्ली येथे ए.टी.एम. ऑपरेशन्स म्हणुन नोकरी करतात. फिर्यादी यांचे कंपनीतील ऑडीटर यांनी केलेल्या ऑडीट प्रमाणे त्यांचे सेक्युरीट्रान्स,दिल्ली येथील कंपनीची सेक्युरीट्रान्स इंडीया प्रायव्हेट लिमिटेड, सत्संग भवन,औंध रोड,खडकी,पुणे या शाखेत काम करणारे कस्टोडियन यातील नमुद इसमांनी त्यांना नेमुन दिलेल्या रुट नं.८ हया मार्गावरील १.पंजाब नॅशनल बँक २.आय सी आयसीआय बँक ३.सेंट्रल बँक ४.टाटा (WLA) व ५.मनीस्पॉट हे मॅनेज सर्व्हीस प्रोवायडर यांचे २१ एटीएम मशिन्स पैकी १७ एटीएम मशिन्सचे त्याचेकडील गोपनीय पासवर्डचा गैरवापर करुन,त्याचा साथीदार शिनु राजकुमार सिंधु सालादल्लु,रा.पिंपळे-गुरव कमानी जवळ,पुणे याचे मदतीने आपसात संगनमत करुन एकुण १७ एटीएम मशिन्स मधील लोकांच्या सार्वजनिक हितासाठी ठेवण्यात आलेल्या रकमेतील १,३५,३४,७००/- (एक करोड पस्तीस लाख चौतीस हजार सातशे) रुपयांचा अप्रामाणिकपणे अपहार केला. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे), अजित लकडे ९८२२९०९२११ |

## <u>दि.२६/११/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ६६६/१७,भादविक ३०७,३२३,५०४,३४ |
| **फिर्यादी** | अनिल नागनाथ बनपट्टे,वय-२८,रा.ओंकार कॉलनी,काळेवाडी,पुणे |
| **आरोपी** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/११/१७ रोजी २१/३० वा.ओंकार कॉलनी,बी.टी.ममोरियल स्कुलचे पाठीमागे काळेवाडी, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी आप-आपसात संगनमत करून,फिर्यादी यांचा भाऊ सचिन नागनाथ बनपट्टे, यास दारू पिण्यासाठी पैसे मागुन ते दिल्याने त्याचा राग मनात धरून जीवे ठार मारण्याचे उद्देशाने लोखंडी कोयत्याने सचिन याचे डावे कानाचेवर मारून जखमी केले. तसेच फिर्यादी हे त्यांचे मध्ये आले असताना त्यांनी फिर्यादी यांचेवर वार करीत असताना,त्यांनी हातावर वार घेतला असता,त्यांचे हाताचे पंजास जखम झाली. त्यानंतर सदर इसमांनी इतर तीन इसमांना मारून जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मोहन जाधव ८३८००७३५८३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**